# बृहन्मुंबई महानगरपालिका

बृहन्मुंबई महानगरपालिकेमधील देवनार पशुवधगृह या खात्याच्या आस्थापनेवरील रु.52000-165100 या वेतनश्रेणीतील पशुवैद्यकीय अधिकारी या संवर्गातील 12 रिक्त पदे भरण्यासाठी पात्र व इच्छुक उमेदवारांकडून दिनांक 21.12.2019 ते दिनांक 05.01.2020 पर्यंत ऑनलाईन अर्ज मागविण्यात येत आहेत.

**सामाजिक व समांतर आरक्षणाने भरावयाची पदे**

| | पशुवैद्यकीय अधिकारी, 'ब' गट एकूण पदे - 12 | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| जात प्रवर्ग | अजा | अज | विजा (अ) | भज (ब) | भज (क) | भज (ड) | इमाव | विमाप्र | सा.व.शै. मागासवर्ग | ईडब्ल्यूएस | खुला | एकूण पदे |
| | 2 | - | - | - | - | 1 | 2 | - | 2 | 1 | 4 | 12 |
| | रिक्त जागांचे प्रवर्गनिहाय सामाजिक/समांतर आरक्षणाचे विवरण खालीलप्रमाणे आहे. | | | | | | | | | | | |
| सर्वसाधारण | 1 | - | - | - | - | 1 | 1 | - | 1 | 1 | 2 | 7 |
| खेळाडू (5%) | - | - | - | - | - | - | - | - | - | - | 1 | 1 |
| महिला (30%) | 1 | - | - | - | - | - | 1 | - | 1 | - | 1 | 4 |
| एकूण | 2 | - | - | - | - | 1 | 2 | - | 2 | 1 | 4 | 12 |

बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर सदरची संपूर्ण जाहिरात अटी व शर्तींसह प्रसिध्द करण्यात येत आहे. उमेदवारांनी संकेतस्थळावरील जाहिरातीला अनुसरुन जाहिरातीतील नमूद अटी व शर्तीनुसार आपले अर्ज ऑनलाईन पध्दतीने अपलोड करावेत. ऑनलाईन प्रक्रीयेशिवाय केलेले अर्ज विचारात घेतले जाणार नाहीत. ऑनलाईन अर्ज भरावयाची माहिती बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.

1) उमेदवारांनी अर्जासोबत माहिती सादर करताना सतत कार्यान्वित असलेला अचूक भ्रमणध्वनी क्रमांक व ई-मेल आयडी नमूद करावा.
2) ऑनलाईन अर्ज करण्याचा कालावधी दिनांक 21.12.2019 पासून दिनांक 05.01.2020 रात्री 12.00 वाजेपर्यंत राहील.
3) वर दिलेल्या विहित वेळेनंतर संकेतस्थळावरुन अर्ज भरण्याची प्रक्रीया काढून टाकण्यात येईल.
4) भरती प्रक्रीयेसाठी पात्र उमेदवारांची यादी बृहन्मुंबई महानगरपालिकेच्या http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल. उमेदवारांनी सदरचे यादीत स्वत:चे नाव तपासून ऑनलाईन परीक्षेकरीता उपस्थित राहावे. त्याबाबत स्वतंत्र पत्रव्यवहार करण्यात येणार नाही.
5) ऑनलाईन परीक्षेत मिळालेल्या गुणांच्या आधारे बनविलेल्या गुणवत्ता यादीतील उमेदवारांमधून सामाजिक/समांतर आरक्षणानुसार निवड यादी तयार करण्यात येईल व http://portal.mcgm.gov.in या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.

**टिप :-**

नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तींसाठी आरक्षित असलेले 1 पद उपरोक्त तक्त्यातील पदांमध्ये समाविष्ट आहे. तथापि, शासन निर्णय क्र. दिव्यांग 2018/प्र.क्र. 114/16 अ दि. 29/05/2019/ अन्वये दिलेल्या निर्देशानुसार सुधारित पदनिश्चितीचा प्रस्ताव शासनास स्वतंत्रपणे सादर करण्यात येणार आहे. सदर प्रस्तावास शासनाची मान्यता प्राप्त झाल्यानंतर नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तींसाठी आरक्षित असलेले 1 पद भरण्याकरिता स्वतंत्रपणे जाहिरात देण्यात येईल. तोपर्यंत नि:समर्थ (दिव्यांग) व्यक्तींसाठी आरक्षित असलेले 1 पद खुल्या प्रवर्गातील एकूण रिक्त पदांमधून रिक्त ठेवण्यात येत आहे.

- भरतीसाठी जाहीर केलेल्या रिक्त पदांच्या संख्येत वाढ किंवा घट होण्याची शक्यता आहे.
- रिक्त पदांच्या संख्येत बदल करण्याबाबत तसेच सामाजिक/समांतर आरक्षण बदलण्याचे अधिकार किंवा भरती प्रक्रीया अंशत:/पूर्णत: रद्द करण्याचे अधिकार बृहन्मुंबई महानगरपालिका आयुक्त यांना राहतील. याबाबत कोणालाही कोणताही वाद उपस्थित करता येणार नाही.
- सामाजिक आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे भरती प्रक्रीया राबविली जाईल.
- अन्य समांतर आरक्षणाची पदे भरण्यासाठी शासनाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या शासन निर्णयाप्रमाणे भरती प्रक्रीया राबविली जाईल.

उमेदवाराने अर्ज सादर करण्यापूर्वी महापालिकेच्या संकेतस्थळावरील सूचना काळजीपूर्वक वाचाव्यात. फक्त ऑनलाईनद्वारे अर्ज स्विकारण्यात येणार असल्यामुळे महापालिकेने छापील अर्ज उपलब्ध करुन दिलेले नाहीत याची नोंद घ्यावी.

बृ.म.पा./पीआरओ/जाहिरात/ /2019-2020

दिनांक

Please visit our official website http://portal.mcgm.gov.in

सही/-

महाव्यवस्थापक

देवनार पशुवधगृह